# मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र.मनपा/विधी/६६२/२०१९-२०
दि. २८/०२/२०२०.

प्रति,

मा. सिस्टिम मॅनेजर
संगणक विभाग.
मिरा भाईंदर महानगरपालिका.

संगणक विभाग
आवक क्र. ९५४८
दिनांक : २८/२/2020

**विषय :** जाहिर सुचना प्रसिध्द करणेबाबत.

**महोदया,**

वरील विषयान्वये आपणास कळविण्यात येते कि, मिरा भाईंदर महानगरपालिका अभियोक्ता पॅनेलवर मा. न्यायालय, ठाणे येथील प्रकरणांमध्ये काम पाहणेकरीता नव्याने २ अभियोक्त्यांची नियुक्ती करणेकरीता जाहिर सुचना प्रसिध्द करण्यास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे. त्याअनुषंगाने सोबत जोडलेली जाहिर सुचना दि. २८/०२/२०२० रोजी दैनिक "ठाणेवैभव" व "आपल महानगर" या दैनिक वृत्तपत्रात दि. २८/०२/२०२० रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

तरी सदरची जाहिर सुचना या पत्रासोबत आपणास उपलब्ध करुन देण्यात येत असुन महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरदेखील प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

Kwadke
सई वडके
विधी अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

(P.T.O.)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**विधी विभाग, मुख्य कार्यालय, भाईंदर**

छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प) ता. जि. ठाणे - ४०१ १०१. फोन नं २८१९२८२८

जा.क्र.मनपा/विधी/६५८/२०१९-२० दि. २७/०२/२०२०

## //जाहिर सुचना//

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने मा. दिवाणी व फौजदारी न्यायालय, ठाणे व मा. जिल्हा न्यायालय, ठाणे येथे दाखल दावे/खटल्यांतील कामकाज पाहण्याकरीता दोन अनुभवी वकिलांची महानगरपालिका अभियोक्ता पॅनेलवर नियुक्ती करावयाची आहे. त्याकरीता खालील अटीशर्तींच्या अनुषंगाने पात्र व इच्छुक उमेदवारांचे टंकलिखित पुर्ण माहिती नमुद केलेले अर्ज दि. ०२/०३/२०२० ते १६/०२/२०२० या कालावधीमध्ये कार्यालयीन वेळेत **विधी विभाग, पहिला मजला, मुख्य कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका** येथे स्विकारले जातील.

**अटीशर्ती :-**

१) कायदा शाखेची पदवी आवश्यक.

२) न्यायालयीन दिवाणी तसेच फौजदारी दावे हाताळण्याचा वकिल म्हणुन किमान ७ वर्षे काम केल्याचा अनुभव (मा. न्यायालय, ठाणे येथे दिवाणी व फौजदारी काम केलेल्यास प्राधान्य.)

३) अर्जामध्ये पुर्ण नाव पत्ता, जन्मतारीख, शैक्षणिक अर्हता, पुर्वानुभव नमुद करावा. अपुर्ण अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

४) अर्जासोबत शैक्षणिक पात्रता, वकिली (Sanad), तसेच Bar Association येथील अनुभवाचा दाखला इ. सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

सई वडके<br>
विधी अधिकारी<br>
मिरा भाईंदर महानगरपालिका